# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.



Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०५ मे, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)


## सोशल मिडीयावरील फसव्या जाहीरातीपासुन सावध रहा!
## घरपोच डिलीवरीचे नावाखाली फसवणुकीची जाहीरात...

कोरोना विषाणुमुळे सुरु असलेल्या लॉकडाउन दरम्यान सर्व नागरीकांना यांना विनाकारण घराबाहेर न पडण्याचे प्रशासनाचे आदेश आहे. नागरीक हे आपआपल्या घरात बसुन इंटरनेटच्या माध्यमातुन सोशल मिडीयाचा मोठया प्रमाणामध्ये वापर करीत असुन इतरही ऑनलाईन सेवा घेत आहेत. परंतू इंटरनेटच्या माध्यमातुन काही ठगबाजी/फसवणुक करणारे इसम सोशल मिडीयाचा दुरुपयोग करुन आर्थिक फसवणुक करीत असल्याचे पोलीस विभागाचे निर्दशनास आले आहे.

मागील काही दिवसापासुन फेसबुक या सोशल मिडीयावर call me home delivery अशा प्रकारे जाहीरात देवुन त्याठिकाणी दारुच्या बॉटलचे फोटो व मो.क्रं.९१०११९८०७८,९७८३९४०७६८,९९८२८५२९६४ अशाप्रकारे नमुद केलेले आहेत. पोलीसांनी या क्रंमाकांची प्राथमिक स्तरावर पडताळणी केलेली असता, सदर क्रंमाक हे बाहेरील राज्यातील असुन बाहेरील राज्यातुन ऑपरेट होत असल्याचे आढळुन आले आहे. **चंद्रपुर जिल्हयामध्ये अशाप्रकारे होम डिलीवरीची कोणतीही शक्यता नाही. उलट तुमची फसवणुकचीच दाट शक्यता आहे.** आपण ग्राहक म्हणुन या क्रंमाकावर फोन केल्यास आपणास काही पैसे सुरवातीला दयावे लागतील व उर्वरीत पैसे डिलीवरी झाल्यानंतर, असे सांगण्यात येते. परंतू हे सर्व बनावट असल्याचे प्राथमिक चौकशीमध्ये आढळुन आललेले आहे. तरी सर्व नागरीकांना असे आवाहन करण्यात येत आहे की, सोशल मिडीयावरील अशाप्रकारच्या फसव्या जाहीरातवर कोणत्याहीप्रकारे विश्वास ठेवू नये. खात्री पटल्याशिवाय ऑनलाईन पेमेंट करुन नये, तसेच मोबाईल फोनवर कोणत्याही अनोळखी व्यक्तीस आपल्या बॅक अकांउटचे डिटेल शेअर करु नये. अशाप्रकारे ऑनलाईन फ्रॉड/कॉल पासुन सावध रहावे. असे आवाहन चंद्रपुर पोलीसांकडुन करण्यात येत आहे.

सतर्क रहा सुरक्षीत रहा..................

———————————————————————————————